पाने २४ | किंमत : ४.०० अंकासोबत स्मार्ट पुरवणी

पुण्य नगरी

मंगळवार, ६ फेब्रुवारी २०१८ | मुंबई | वर्ष :१८ | अंक : ३०४ | पाने १२+१२=२४ www.epunyanagari.com | Call Center : 18001206252

# कामगार कबड्डी स्पर्धेत देना बँकेचे वर्चस्व

**मुंबई** : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आयोजित राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेच्या अंतिम सामन्यांत देना बँकेने शहरी पुरुष आणि महिला खुल्या अशा दोन्ही गटात निर्विवाद वर्चस्व सिद्ध करीत विजेतेपदाला गवसणी घातली. पुरुष गटात नितीन देशमुखच्या अष्टपैलू खेळामुळे देना बँक स्पोर्ट्स क्लबने मुंबई पोर्ट ट्रस्टचा ४ गुणांनी तर महिला गटात पूजा यादवच्या अप्रतिम खेळामुळे देना बँक स्पोर्ट्स क्लबने उपनगरच्या स्वराज्य संघाचा १४ गुणांनी पराभव केला. आमदार भाई जगताप, माजी नगरपाल जगन्नाथ हेगडे, कामगार नेते दिलीपदादा जगताप,



अर्जुन पुरस्कारप्राप्त कबड्डीपटू राजू भावसार, कल्याण आयुक्त सतीश दाभाडे यांच्या उपस्थितीत विजेत्यांना गौरवण्यात आले.

पुरुष शहरी गटात देना बँक स्पोर्ट्स क्लब मुंबई वि. मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्यामध्ये अंतिम सामना चुरशीचा झाला. देना बँकेने पहिल्या डावात नितीन देशमुख, ऋतुराज गावडे यांच्या चढाईच्या जोरावर १९-९ अशी १० गुणांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात पोर्ट ट्रस्टने पिछाडी भरून काढण्यासाठी निकराची झुंज दिली. शुभम कुंभार, वसंत मांडेकर यांच्या चढाया आणि मनोज बामच्या भक्कम पकडीच्या जोरावर मुंबई पोर्ट ट्रस्टने उत्तरार्धात बरोबरीही साधली. परंतु निर्णायक क्षणी अष्टपैलू नितीन देशमुख, ऋतुराज गावडे आदी खेळाडूंनी महत्त्वपूर्ण खेळ करीत प्रतिस्पर्ध्यांचे आव्हान २८-२४ असे मोडीत काढले.

महिलांच्या अंतिम लढतीत देना बँकेचा दबदबा दिसून आला. देना बँकेने मुंबई उपनगरच्या स्वराज्य संघाचा ३०-१६ असा धुव्वा उडवला. देना बँकेच्या चढाईपटू पूजा यादव, दीक्षा जोशी आणि बचावपटू पौर्णिमा जेधे, साक्षी रहाटे यांच्या खेळापुढे स्वराज्यचा संघ हतबल झाला. स्वराज्यकडून स्मिता पांचाळ, अंजली रोकडे, राणी उपहार, काजल खैरे यांनी छान प्रयत्न केले. पुरुष शहरी गटात सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार अष्टपैलू खेळाडू नितीन देशमुख (देना बँक), चढाईसाठी शुभम कुंभार (मुंबई पोर्ट ट्रस्ट) व क्षेत्ररक्षणसाठी मनोज बोंद्रे (मुंबई पोर्ट ट्रस्ट) यांना पुरस्कार देण्यात आला. महिला गटात सर्वोत्तम खेळाडूचा मान अष्टपैलू खेळाडू पूजा यादव (देना बँक), चढाईसाठी स्मिता पाटील (स्वराज्य संघ) व क्षेत्ररक्षणसाठी काजल खैरे (स्वराज्य संघ) यांना पुरस्कार देण्यात आला. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट संचलन चषकाचा मानकरी भारतीय आयुर्विमा महामंडळ हा संघ ठरला. सहायक कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे यांनी आभार मानले.

Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57
मुंबई, मंगळवार, ६ फेब्रुवारी २०१८
तापमान कमाल ३३° सें किमान १९° सें
हवामानाचा अंदाज
आकाश निरभ्र राहील.
मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध
लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !





राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

# देना बँकेचे दोन्ही गटांमध्ये वर्चस्व!

**क्रीडा प्रतिनिधी, मुंबई**

**कामगार कल्याण** मंडळाच्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेच्या अंतिम सामन्यांमध्ये देना बँकेने पुरुष शहर आणि महिला खुल्या अशा दोन्ही गटांमध्ये निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले, तर पुरुष ग्रामीण गटात जेएसडब्ल्यू संघाला विजेतेपद मिळाले.

पुरुष शहरी गटात देना बँक स्पोर्ट्स क्लबने मुंबई पोर्ट ट्रस्टचा २८-२४ असा पाडाव केला. देना बँकेने पहिल्या डावात नितीन देशमुख, ऋतुराज गावडे यांच्या चढाईच्या जोरावर १९-९ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात पोर्ट ट्रस्टने गुणांतील फरक कमी करण्यासाठी निकराचा लढा दिला. शुभम कुंभार, वसंत मांडेकर यांच्या चढाया आणि मनोज बामच्या भक्कम पकडीच्या जोरावर पोर्ट ट्रस्टने एक वेळ डाव बरोबरीतही आणला होता. मात्र देना बँकेला हरवण्यात ते अपयशी ठरले.

महिलांच्या अंतिम लढतीत देना बँकेने मुंबई उपनगरच्या स्वराज्य संघाचा ३०-१६ असा धुव्वा उडवला. देना बँकेच्या चढाईपटू पूजा यादव, दीक्षा जोशी आणि बचावपटू पौर्णिमा जेधे, साक्षी रहाटे यांच्या खेळापुढे स्वराज्य संघाचा निभाव लागला नाही. स्वराज्यकडून स्मिता पांचाळ, अंजली रोकडे, राणी उपहार, काजळ खैरे यांचे प्रयत्न तोकडे पडले.

पुरुष शहरी गटात स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा मान नितीन देशमुखने (देना बँक) पटकावला. याचप्रमाणे मुंबई पोर्ट ट्रस्टचा शुभम कुंभार सर्वोत्तम चढाईपटू व मनोज बोंद्रे सर्वोत्तम पकडपटू ठरला. महिला गटात पूजा यादव (देना बँक) स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली. स्मिता पाटील (स्वराज्य संघ) सर्वोत्तम चढाईपटू आणि काजल खैरे (स्वराज्य संघ) सर्वोत्तम पकडपटू ठरली.

पुढारी

# कामगार कबड्डी स्पर्धेत देना बँकेचे वर्चस्व

## ग्रामीण गटात जेएसडब्ल्यू अव्वल : नितीन देशमुख, ऋतुराज गावडेची चांगली खेळी

**मुंबई : क्रीडा प्रतिनिधी**

राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेच्या अंतिम सामन्यांत देना बँकेने शहरी पुरुष आणि महिला खुल्या अशा दोन्ही गटात निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. तर पुरुष ग्रामीण गटात जेएसडब्ल्यू - डोलवी संघ अव्वल ठरला.

पुरुष शहरी गटात अंतिम सामना देना बँक स्पोर्ट्स क्लब मुंबई वि. मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्यात झाला. देना बँकेने पहिल्या डावात नितीन देशमुख, ऋतुराज गावडे यांच्या चढाईच्या जोरावर १९-९ अशी १० गुणांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात पोर्ट ट्रस्टने गुणांतील फरक कमी करण्यासाठी निकराचा लढा दिला. शुभम कुंभार, वसंत मांडेकर यांच्या चढाया आणि मनोज बामच्या भक्कम पकडीच्या जोरावर पोर्ट ट्रस्टने एकवेळ डाव बरोबरीतही आणला होता. मात्र राजेश पाडावे सारखे प्रशिक्षक आणि सततचा सराव यामुळे देना बँकेचा आत्मविश्वास शेवटपर्यंत दिसून आला. देना बँकेने २८-२४ अशी आघाडी घेत आपले यश संपादन केले.

पुरुष ग्रामीण गटात जेएसडब्ल्यू - डोलवी वि. कुंभी कासारी - कुडित्रे कोल्हापूर यांच्यात अंतिम झुंज बघायला मिळाली. पहिल्या डावात दोन्ही संघांकडून आक्रमक खेळी बघायला मिळाली. कुंभी कासारीच्या शिवाजी पाटील, सर्जेराव माने यांची चढाई आणि रंगराव पाटील, अशोक कोरवी यांच्या पकडी लक्षवेधक ठरल्या. आपल्या चढाईने मैदान गाजवणाऱ्या जेएसडब्ल्यूच्या स्मितील पाटीलला प्रतिस्पर्धी संघाने अनेकवेळा टार्गेट केल्याचे पाहायला मिळाले. प्रेक्षकांनी या क्षणांचा भरपूर आनंद लुटला. पहिला डावात जे.एस.डब्ल्यू ११-१० अशा एवघ्या एक गुणांनी आघाडीवर होता. दुसऱ्या डावात मात्र जे.एस.डब्ल्यूने कुंभी कासारीला पुरते लोळवले. राज पाटील, राहुल कोळी यांच्या चढाया आणि सुमित शिर्के, राकेश तांडेल यांच्या अचूक पकडीमुळे जेएसडब्ल्यूने ३३-१९ असे वर्चस्व राखत सामना आपल्या नावावर केला.

महिलांच्या अंतिम लढतीत देना बँकेचा दबदबा बघायला मिळाला. देना बँकेने मुंबई उपनगरच्या स्वराज्य संघाचा ३०-१६ असा धुव्वा उडवला. देना बँकेच्या चढाईपटू पूजा यादव, दीक्षा जोशी आणि बचावपटू पौर्णिमा जेधे, साक्षी रहाटे यांच्या खेळापुढे स्वराज्यचा संघ हतबल ठरला. स्वराज्यकडून स्मिता पांचाळ, अंजली रोकडे, राणी उपहार, काजळ खैरे यांचे प्रयत्न तोकडे पडले.



● पुरुष शहरी गटात सर्वोत्तम खेळाडूचा मान अष्टपैलू खेळाडू नितीन देशमुख (देना बँक), चढाईसाठी शुभम कुंभार (मुंबई पोर्ट ट्रस्ट) व क्षेत्ररक्षण (पकड) साठी मनोज बोंद्रे (मुंबई पोर्ट ट्रस्ट) यांना देण्यात आला. पुरुष ग्रामीण गटात सर्वोत्तम खेळाडूचा मान अष्टपैलू खेळाडू धनाजी पाटील (कुंभी कासारी कोल्हापूर), चढाईसाठी सुजित पाटील (जे.एस.डब्ल्यू. डोलवी) व क्षेत्ररक्षण (पकड) साठी राहुल पाटील (जे.एस.डब्ल्यू. डोलवी) यांना देण्यात आला. महिला गटात सर्वोत्तम खेळाडूचा मान अष्टपैलू खेळाडू पूजा यादव (देना बँक), चढाईसाठी स्मिता पाटील (स्वराज्य संघ) व क्षेत्ररक्षण (पकड) साठी काजल खैरे (स्वराज्य संघ) यांना देण्यात आला. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट संचलन चषकाचा मानकरी भारतीय आयुर्विमा महामंडळ हा संघ ठरला.



www.maharashtratimes.com
मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र
महाराष्ट्र टाइम्स
मुंबई । मंगळवार, ६ फेब्रुवारी २०१८

# देना बँक, जेएसडब्ल्यू जेते

**मुंबई :** राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेत देना बँकेने शहरी पुरुष आणि महिला खुल्या अशा दोन्ही गटात निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. तर पुरुष ग्रामीण गटाचे जेतेपद पटकावले ते जेएसडब्ल्यू डोलवी संघाने.

पुरुष शहरी गटाच्या अंतिम सामन्यात देना बँकने (मुंबई) मुंबई पोर्ट ट्रस्टवर २८-२४ अशी मात केली. ग्रामीण गयत जेएसडब्ल्यू डोलवी संघाने कुंभी कासारी कुडित्रे कोल्हापूर यांच्यावर ३३-१९ अशी सहज मात केली.

महिलांच्या अंतिम लढतीत देना बँकेचा दबदबा बघायला मिळाला. देना बँकेने मुंबई उपनगरच्या स्वराज्य संघाचा ३०-१६ असा धुव्वा उडवला. देना बँकेच्या चढाईपटू पूजा यादव, दीक्षा जोशी आणि बचावपटू पौर्णिमा जेधे, साक्षी रहाटे यांच्या खेळापुढे स्वराज्यचा संघ हतबल ठरला.

पाने २४ । किंमत : ४.०० अंकासोबत स्मार्ट पुरवणी
पुण्य नगरी
बुधवार, ७ फेब्रुवारी २०१८ । मुंबई । वर्ष :१८ । अंक : ३०५ । पाने १२+१२=२४ www.epunyanagari.com | Call Center : 18001206252

# ग्रामीण कामगार कबड्डीत जेएसडब्ल्यू अजिंक्य

**मुंबई** : जे.एस.डब्ल्यू डोलवी संघाने कुंभी कासारी-कुडित्रे कोल्हापूर संघाचा १४ गुणांनी पराभव करून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आयोजित राज्यस्तरीय ग्रामीण कामगार कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. पूर्वार्धात अटीतटीमध्ये रंगलेला अंतिम फेरीचा सामना चढाईपटू राज पाटील, स्मितील पाटील व बचावपटू सुमित शिर्के यांनी जे.एस.डब्ल्यू संघाच्या बाजूने झुकवला आणि विजेतेपदावर शिक्कामोर्तब केला. कुंभी कासारीच्या शिवाजी पाटील, रंगराव पाटील यांनी शर्थीची झुंज देऊनही त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

कामगार पुरुष ग्रामीण गटात जे. एस.डब्ल्यू-डोलवी विरुद्ध कुंभी कासारी-कुडित्रे कोल्हापूर यामध्ये अंतिम झुंज चुरशीची झाली. पहिल्या डावात दोन्ही संघांकडून आक्रमक खेळी बघायला मिळाल्या. कुंभी कासारीच्या शिवाजी पाटील, सर्जेराव माने यांच्या चढाया आणि रंगराव पाटील, अशोक कोरवी यांच्या पकडी लक्षवेधक ठरल्या. आपल्या चढाईने मैदान गाजवणाऱ्या जे.एस.डब्ल्यू संघाच्या स्मितील पाटीलला प्रतिस्पर्धी संघाने अनेकवेळा टार्गेट करूनही जे. एस.डब्ल्यू संघाने मध्यंतराला ११-१० अशी एक गुणाने आघाडी घेतली.

दुसऱ्या डावात मात्र जे.एस.डब्ल्यू.ने डावपेच बदलत कुंभी कासारी संघाला



जोरदार प्रत्युत्तर देत सामना एकतर्फी करण्यात यश मिळवले. राज पाटील, राहुल कोळी यांच्या चढाया आणि सुमित शिर्के, राकेश तांडेल यांच्या अचूक पकडीमुळे जे.एस.डब्ल्यू. संघाने ३३-१९ असे वर्चस्व राखत सामना व अजिंक्यपद आपल्या नावावर केले. सर्वोत्तम खेळाडूचा मान अष्टपैलू खेळाडू धनाजी पाटील (कुंभी कासारी कोल्हापूर), चढाईसाठी सुजित पाटील (जे.एस.डब्ल्यू. डोलवी) व क्षेत्ररक्षण (पकड)साठी राहुल पाटील (जे.एस.डब्ल्यू. डोलवी) यांना आमदार भाई जगताप, कल्याण आयुक्त सतीश दाभाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार देण्यात आला.

पुढारी

# जे.एस.डब्ल्यू., कुंभी कासारी अंतिम फेरीत

## ■ कामगार कबड्डी स्पर्धा

**मुंबई : क्रीडा प्रतिनिधी**

जे.एस.डब्ल्यू., कुंभी कासारी यांनी आपापल्या सामन्यात चमकदार कामगिरी करत कामगार कबड्डी स्पर्धेत चमकदार कामगिरी करत आगेकूच केली. पुरुष ग्रामीण गटात दबदबा असणाऱ्या टाटा स्टील तारापूर संघाला जे.एस.डब्ल्यू डोलवी संघाने धूळ चारली. स्मितिल पाटील, राहुल कोळी यांची चढाई आणि राकेश तांडेल, सुमित शिर्के यांच्या पकडीमुळे जे.एस.डब्ल्यू संघाला (४३-२७) असे वर्चस्व राखता आले.

पुरुष ग्रामीण संघात उपांत्य फेरीचा दुसरा सामना कुंभी कासारी कुडित्रे वि.जे.एस.डब्ल्यू साळाव यांच्यात झाला. कुंभी कासारीच्या धनाजी पाटील, शिवाजी पाटील यांच्या खोलवर चढाया व रंगराव पाटील याची मजबूत पकड क्रीडा प्रेमींची दाद मिळवून गेली. जे.एस.डब्ल्यूचे चढाईपटू विवेक पाटील, संदेश पाटील व पकड करणारे बंटी पाटील यांनी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र कुंभी कासारीने (३३-२८) गुणांसह विजय मिळवला. महिला संघात स्वराज्य स्पो.क्लब वि. अनिकेत स्पो.क्लब खेड यांच्यातही चुरस पहायला मिळाली. पहिल्या डावात आघाडीवर असणा-या स्वराज्य स्पो.क्लबला दुस-या डावात आघाडी कायम ठेवताना चांगलीच दमछाक झाली. स्वराज्यला श्रुतिका घाडीगांवकर, स्मिता पांचाळ या अनुभवी चढाईपटूमुळे (२८-२३) असा विजय मिळवता आला.





● बँक ऑफ इंडियाला अक्षय उगाडे, विराज उतेकर यांनी केलेल्या चढाया आणि कुलदीप माईनकरच्या पकडीमुळे रिझर्व बँकेवर (४३-२८) असा विजय मिळविता आला. दुसऱ्या दिवशी झालेल्या सामन्यात सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून पुरुष शहरी संघातील गिरीश भगत (सिमेन्स), महिला गटात तेजस्विनी चौगुले स्मितिल पाटील (जे.एस.डब्ल्यू डोलवी) यांना गौरविण्यात आले.

लोकमत

## कामगार कबड्डी : बलाढ्य तारापूर संघाला दिला पराभवाचा धक्का

# डोलवी संघ अंतिम फेरीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कामगार कबड्डी स्पर्धेमध्ये जेएसडब्ल्यू डोलवी संघाने धक्कादायक विजयासह अंतिम फेरी गाठताना बलाढ्य आणि संभाव्य विजेत्या मानले जात असलेल्या टाटा स्टील तारापूर संघाला ४३-२७ असे लोळवले. दुसरीकडे महिला गटात स्वराज्य स्पोर्ट्स क्लब संघाने अटीतटीच्या सामन्यात बाजी मारताना अनिकेत स्पोर्ट्स क्लबचा २८-२३ असा पराभव केला.



स्पर्धेतील एका सामन्यात रंगलेला चुरशीचा क्षण.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने सुरु असलेल्या २३व्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार कबड्डी स्पर्धेत डोलवी संघाने अनपेक्षित बाजी मारत बलाढ्य तारापूर संघाच्या आव्हानातली हवा काढली. स्मितिल पाटील, राहुल कोळी यांच्या खोलवर चढाया आणि राकेश तांडेल, सुमित शिर्के यांच्या भक्कम पकडी याजोरावर डोलवी संघाने शानदार विजयाची नोंद करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अन्य सामन्यात सांघिक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करताना कुंभी कासारी कुडित्रे संघाने जेएसडब्ल्यू साळाव संघाचा ३३-२८ असा पाडाव केला. धनाजी पाटील, शिवाजी पाटील यांच्या खोलवर चढाया आणि रंगराव पाटीलचे दमदार संरक्षण कुंभी संघाच्या विजयात निर्णायक ठरले. पराभूत संघाकडून विवेक पाटील, संदेश पाटील आणि बंटी पाटील यांनी अपयशी झुंज दिली.

महिलांच्या खुल्या गटामध्ये स्वराज्य स्पोर्ट्स क्लब संघाने चुरशीच्या सामन्यात २८-२३ असा रोमांचक विजय मिळवताना अनिकेत स्पोर्ट्स क्लब संघाचे आव्हान संपुष्टात आणले. पहिल्या डावात आघाडी मिळवल्यानंतर स्वराज्य संघाला अनिकेत संघाकडून कडवी झुंज मिळाली. यावेळी, सामना पालटण्याची चिन्हे दिसत होती, परंतुअ मोक्याच्यावेळी खेळ उंचावताना स्वराज्यने हातातील सामना निसटू दिला नाही. श्रुतिका घाडिगावर, स्मिता पांचाळ या अनुभवी खेळाडूंच्या आक्रमक खेळाच्या जोरावर स्वराज्य संघाने बाजी मारली.

पुरुषांच्या शहर गटामध्ये बँक ऑफ इंडियाने लक्षवेधी विजय मिळवताना बलाढ्य रिझर्व्ह बँकेला नमवले. अक्षय उगाडे, विराज उतेकर यांच्या चढाया आणि कुलदीप माईनकरच्या पकडी याजोरावर बँक ऑफ इंडियाने ४३-२८ अशी बाजी मारत रिझर्व्ह बँकेला स्पर्धेबाहेरचा रस्ता दाखवला.

मुंबई, सोमवार, ५ फेब्रुवारी २०१८ । किंमत ₹ ४ पाने १६ (४ पानी टुडेसह)★

मुंबई। पु
नागपूर।

सकाळ

# एएसडब्ल्यू उपांत्य फेरीत

**मुंबई** : जेएसडब्ल्यू, कुंभी कासारी यांनी कामगार कबड्डी स्पर्धेच्या पुरुष ग्रामीण गटात उपांत्य फेरी गाठली. उपांत्यपूर्व फेरीचे निकाल, पुरुष ग्रामीण- जेएसडब्ल्यू, डोलवी : ४३ (स्मितील पाटील, राहुल कोळी, राकेश तांडेल) वि. वि. टाटा स्टील, तारापूर : २३. कुंभी कासारी कुडित्रे : ३३ (धनाजी पाटील, शिवाजी पाटील, रंगराव पाटील) वि. वि. जेएसडब्ल्यू साळाव : २८ (संदेश पाटील, विवेक पाटील, बंटी पाटील). महिला- स्वराज, उपनगर : २८ (श्रुतिका घाडीगावकर, स्मिता पांचाळ) वि. वि. अनिकेत खेड : २३. देना बँक वि. वि. शिवशक्ती २८-१५. महाराष्ट्र पोलिस वि. वि. शिवनेरी ३९-११. पुरुष शहरी- सेंट्रल बँक वि. वि. पी. डी. हिंदुजा ३५-१७. मुंबई बंदर वि. वि. भारत पेट्रोलियम २८-१०.

Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57
मुंबई, सोमवार, ५ फेब्रुवारी २०१८
मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध
लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !

तापमान
कमाल ३६°सें किमान १७°सें
हवामानाचा अंदाज
आकाश निरभ्र राहील.

# जेएसडब्लू, कुंभी कासारीमध्ये अंतिम लढत

**मुंबई :** कामगार कबड्डी राज्यस्तरीय स्पर्धेच्या पुरुष ग्रामीण गटात जेएसडब्लू डोलवी आणि कुंभी कासारी संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला. जेएसडब्लू डोलवी संघाने टाटा स्टील तारापूर संघाला ४३-२६ अशी धूळ चारली. स्मितिल पाटील, राहुल कोळी यांची चढाईत, तर राकेश तांडेल, सुमित शिर्के यांनी पकडीत अव्वल खेळ केला. कुंभी कासारीने जेएसडब्लू साळाव यांचा ३३-२८ असा पराभव केला. धनाजी पाटील, शिवाजी पाटील यांच्या खोलवर चढाया आणि रंगराव पाटील याची मजबूत पकड यांच्या जोरावर कुंभी कासारीने हा विजय मिळवला.

www.maharashtratimes.com
मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र
महाराष्ट्र टाइम्स
मुंबई । सोमवार, ५ फेब्रुवारी २०१८ । पाने १२ + मुंबई टाइम्स । शहर आवृत्ती ** । ₹ ४.०० किंवा ७.०० द टाइम्स ऑफ इंडियासहित
दक्षिण आफ्रिके

# रिझर्व्ह बँकेचा पराभव

मुंबईः कामगार कबड्डी स्पर्धेत टाटा स्टील तारापूर संघाला जेएसडब्ल्यू डोलवी संघाने धूळ चारली. जेएसडब्ल्यूने टाटा स्टीलवर ४३-२७ अशी मात केली. पुरुष ग्रामीण संघात उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात कुंभी कासारी कुडित्रे यांनी सरशी साधली. त्यांनी जेएसडब्ल्यू साळाववर ३३-२८ अशी मात केली. पुरुष शहरी संघाच्या उपउपांत्य फेरीत बलाढ्य रिझर्व्ह बँकेला बँक ऑफ इंडियाने नमवले. अक्षय उगाडे, विराज उतेकरच्या चढाया, कुलदीप माईनकरच्या पकडीमुळे बँक ऑफ इंडियाने रिझर्व बँकेवर ४३-२८ असा विजय मिळविला.

नवाकाळ
एकमेव स्वतंत्र दैनिक
१६ पाने
मुंबई, सोमवार ५ फेब्रुवारी, २०१८ • वर्ष-९५, अंक-३३१, पाने-१६, किंमत: ₹४
24x7 : www.enavakal.com संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे Email-navakal.1923@gmail.com

# रिझर्व्ह बँकेला पराभवाचा धक्का

■ मुंबई,

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे आयोजित करण्यात आलेल्या कबड्डी स्पर्धेत बलाढ्य रिझर्व्ह बँकेला पराभवाचा धक्का बसला. बँक ऑफ इंडियाने त्यांना ४३-२८ गुणांनी सहज नमविले. बँक ऑफ इंडियाच्या विजयात अक्षय उगाडे, विराज उतेकर, कुलदीप माईनकर यांचा मोठा वाटा होता.

दुसऱ्या सामन्यात जेएसडब्ल्यू डोलवी संघाने बलाढ्य टाटा स्टील तारापूर संघाने विजय मिळविला. राहुल कोळी, राकेश तांबे, सुमित शिर्के त्यांच्या विजयाचे शिल्पकार होते. महिला गटात स्वराज्य, देना बँक, महाराष्ट्र पोलीस या संघांनी विजय मिळविला.

पाने २४ | किंमत : ४.०० | अंकासोबत स्मार्ट पुरवणी
पुण्य नगरी
सोमवार, ५ फेब्रुवारी २०१८ | मुंबई | वर्ष :१८ | अंक : ३०३ | पाने १२+१२=२४ www.epunyanagari.com | Call Center : 18001206252

# महिला कबड्डी : मुंबई पोलीस उपांत्य फेरीत

**मुंबई** : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या औद्योगिक व्यावसायिक कामगारांच्या राज्यस्तरीय महिला कबड्डी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मुंबई पोलीस, स्वराज्य स्पोर्ट्स क्लब, महाराष्ट्र पोलीस, देना बँक आदी संघांनी प्रवेश केला. मुंबई पोलीस महिला कबड्डी संघाने संघर्ष क्रीडा मंडळाचा २७-२४ असा पराभव केला. मुंबई पोलीस महिला संघाच्या चढाईपटू सिद्धी वाफेलकर, भक्ती इंदुलकर व बचावपटू सोनल धुमाळ यांनी संघर्ष क्रीडा मंडळाच्या सांघिक खेळावर मात करण्यात यश मिळविले.

शिवशक्ती महिला संघ विरुद्ध स्वराज्य स्पोर्ट्स क्लब यामधील सामना अत्यंत अटीतटीचा झाला. पहिल्या डावात स्वराज्यला श्रुतिका घाडीगावकरच्या खोलवर चढाईमुळे १९-१३ अशी आघाडी मिळाली होती. परंतु दुसऱ्या डावात शिवशक्तीने धीर न सोडता पिछाडी भरून काढणारा गुणांचा छान पाठलाग केला. प्रतीक्षा तांडेल व सुधा पोवारच्या चढाईमुळे सामना शेवटच्या मिनिटांत सामना २६-२६ असा बरोबरीत होता. स्वराज्यने शेवटच्या चढाईत दोन गुणांची कमाई केल्याने २८-२६ गुणांसह सामना जिंकला.

आपला
वार्ताहर
मुंबई, वर्ष २४, अंक ११५ ★ सोमवार, ५ फेब्रुवारी २०१८ पाने १०, किंमत ३.०० रु.

# महिला कबड्डी मुंबई पोलीस उपांत्य फेरीत

मुंबई, दि. ४ - महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या औद्योगिक व्यावसायिक कामगारांच्या राज्यस्तरीय महिला कबड्डी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मुंबई पोलीस, स्वराज्य स्पोर्टस् क्लब, महाराष्ट्र पोलीस, देना बँक आदी संघांनी प्रवेश केला. मुंबई पोलीस महिला कबड्डी संघाने संघर्ष क्रीडा मंडळाचा २७-२४ असा पराभव केला. मुंबई पोलीस महिला संघाच्या चढाईपटू सिद्धी वांजळकर, भक्ती इंदुलकर व बचावपटू मेघना धुमाळ यांनी संघर्ष क्रीडा मंडळाच्या सांघिक खेळावर मात करण्यात यश मिळविले.

शिवशक्ती महिला संघ विरुद्ध स्वराज्य स्पोर्टस् क्लब यांच्यातील सामना अत्यंत अटीतटीचा झाला. पहिल्या डावात स्वराज्यला श्रुतिका घाडीगावकरच्या खोलवर चढायांमुळे ११-२३ अशी आघाडी मिळाली होती. परंतु दुसऱ्या डावात शिवशक्तीने धीर न सोडता पिछाडी भरून काढणारा गुणांचा छान पाठलाग केला. प्रतीक्षा तांडेल व सुधा पोवारच्या चढायांमुळे सामना शेवटच्या मिनिटांत सामना २६-२६ असा बरोबरीत होता. स्वराज्यने शेवटच्या चढाईत २ गुणांची कमाई केल्याने २८-२६ गुणांसह सामना जिंकला.